

# मानवगंध

भारत जगाच्या पाठीवरील एक राष्ट्र. सर्व दृष्टीने संपन्न! देशाची जमीन अत्यंत सुपीक. या देशावर निसर्गाने जणू त्याच्या दौलतीची उधळणच केली आहे. एकेकाळी पश्चिमेला इराणपासून ते पूर्वेला म्यानमर, उत्तरेला ताजाकिस्तान ते दक्षिणेला हिंद महासागर असा अवाढव्य पसरलेला देश. देशातील नागरिक देखील अत्यंत देशप्रेमी व उद्यमशील आहेत. अध्यात्म व विज्ञान यांची सांगड या देशाने अत्यंत योग्य प्रकारे घातली आहे. या देशाला पाच हजार वर्षाचा उज्ज्वल इतिहास आहे. जगाला ललामभूत ठरणारे अनेक शोध या देशाने लावले आहेत. गणितात ''शून्याचा शोध, भूमिती, त्रिकोणमिती (trigonometry), कलनशास्त्र (calculus), बीजगणित आदि शाखांमध्ये प्राचीनकाळी अत्यंत प्रगती झाली होती. खागोलशास्त्रात ग्रह, तारे, सूर्यमाला, दिर्घिका यांविषयींचा त्यांचा अभ्यास उल्लेखनीय होता. पृथ्वी सूर्याभोवती फिरते हे त्यांना दोन हजार वर्षांपासून माहित होते. वैद्यकशास्त्रात आयुर्वेदासारखी उपचारपद्धती सखोल संशोधनाद्वारे त्यांनी प्रमाणभूत केली होती. शल्यचिकित्सा (surgery) व कायाकल्प (plastic surgery)) यांविषयीचे त्यांचे ज्ञान अध्ययावत होते. त्यांची नगरे नगररचनाशास्त्राचा विचार करून उभारलेली असत. रुंद रस्ते, रस्त्याच्या दुतर्फा झाडे, सांडपाण्याचा योग्य निचरा होईल अशा पद्धतीने बंदिस्त गटारींना दिलेला उतार हे सर्व नित्याचे होते. विविध देशांतील लाखो विदयार्थी नालंदा, तक्षशीला अशा विद्यापीठांमध्ये शिकण्यासाठी येत असत. मध्यंतरी या देशावर मुघल व इंग्रजांचे परचक्र आले होते. एक हजार वर्षांचा काळाकुट्ट कालावधीही या देशाने अनुभवला. पण या सर्वांतून हा देश तावून सुलाखून निघाला. इंग्रजांनी या

देशाला खिळखिळे करण्यासाठी या देशाची फाळणी केली, पण स्वातंत्र्यानंतर ऐंशी वर्षांनी पंतप्रधान महेंद्र यांनी प्रेम व सहवेदना यांच्या जोरावर वेगळे केलेल्या सर्व देशांना एकत्र आणून पुन्हा अखंड भारताची निर्मिती केली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली देशाची घोडदौड वेगाने सुरु झाली. भारतीय अंतराळ संस्थेने सूर्यमालेतील सर्व ग्रहांकडे उपग्रह पाठवून त्यांची इत्यंभूत माहिती मिळवली, अस्ट्रोसॅट-२ सारखी विविध तरंगलांबींद्वारे विश्वाचा ढांडोळा घेणारी दुर्बीण अंतराळात प्रस्थापित केली, सूर्याच्या अभ्यासासाठी आदित्य-११ हा उपग्रह अंतराळात स्थापन केला. पंतप्रधानांच्या मेक इन इंडिया मोहिमेमुळे देशी उद्योगांना चालना मिळाली, तंत्रज्ञानासाठीचे परदेशांवरील परवलंबित्व कमी झाले. नवीन शिक्षण धोरणामुळे घोकंपट्टीपेक्षा प्रत्यक्ष हाताने मुले विविध गोष्टी करू लागली, विज्ञानातील संकल्पना आत्मसात करू लागली. नवनवीन शोध लागू लागले व त्यांचे स्वामीत्वहक्क (patent)) वैज्ञानिकांना मिळू लागले व त्यावर आधारित उद्योग (start-ups) उभे राहू लागले, आणि प्रथमच भारताची ओळख एक विकसित देश अशी होऊ लागली. देशातील साक्षरतेचे प्रमाण जवळ जवळ १००% झाले. अंधश्रद्धा, अंगारे-धुपारे, बुवाबाजी कमी झाली. भारतातील बरीचशी विद्यापीठे व महाविद्यालये जागतिक दर्जाची झाली. त्यापैकी एक म्हणजे सांगलीचे देवचंद अभियांत्रिकी महाविद्यालय.

महाविद्यालयातील यांत्रिकी शाखेत आर्यन नावाचा एक विद्यार्थी होता. अतिशय हुशार. नेहमी चाकोरीपेक्षा वेगळा (out of box) विचार करणारा. त्याचे नाकही अतिशय तीक्ष्ण होते. ओळखींच्यापैकी एखादा माणूस नुसता जवळून गेला तरी तो त्याचे नांव सांगायचा. मित्रांनी विचारले कि, तो म्हणायचा मला त्यांचा वास येतो. एकदा त्याने विचार केला कि, माणसांच्या बोटांचे ठसे एकमात्र असतात, तसाच माणसाचा गंध एकमात्र असू शकेल का? विचारांचा किडा एकदा डोक्यात घुसल्यावर गप्प बसेल तो आर्यन कसला? त्याने त्या दृष्टीने प्रयोग करायला सुरुवात केली. सर्व प्रथम त्याने एक शोधाग्र (probe) सदृश्य एक साधन (instrument)) बनविले. त्याला त्याने गंधग्राहक असे नांव दिले. त्यानंतर त्याने संगणक सदृश्य एक साधन बनविले. त्याला त्याने नांव दिले गंधसंग्रहक. या संग्रहकाला गंधग्राहक जोडल्यावर तिच्यावरील विदा (माहिती) गंधसंग्रहकामध्ये अंतरित (transfer) करायची सोय होती तसेच गंधसंग्रहकावरून विदा पुनर्प्राप्तीची सोयही होती. या प्रयोगाची माहिती त्याने खातेप्रमुखांना दिली व त्यांना विनंती केली की त्यांनी ही माहिती महाविद्यालयाच्या प्रचार्यांना द्यावी जेणेकरून प्रयोगामध्ये सर्वांचे सहकार्य मिळेल. प्रचार्यांनी सूचना फलकावर ही माहिती लावली व सर्व शिक्षक व विध्यार्थ्यांना आर्यनच्या प्रयोगासाठी सहकार्य करायचे आवाहन केले. त्यानंतर आर्यन प्रत्येक विद्यार्थ्याजवळ जाऊन त्यांचे गंध गोळा करू लागला व हा गंधांचा विदा ज्या त्या विध्यार्थ्याच्या नावासहित त्याने गंधसंग्रहकामध्ये भरला. आता वेळ आली होती प्रयोगाचे परिणाम पाहण्याची. त्यासाठी आर्यनने सावरकर सभागृह मध्ये सर्व विद्यार्थी, शिक्षक, विभागप्रमुख व प्रचार्यांना एका ठराविक दिवशी व ठराविक वेळी येण्याची विनंती केली. त्याप्रमाणे सर्वजण जमले. त्यानंतर गंधग्राहक घेऊन आर्यन एका मुलाजवळ गेला. त्यानंतर तो गंधग्राहक त्याने गंधसंग्रहकाला जोडून शोध (search) ही आज्ञा (command) दिली. गंधसंग्रहकाने बरोब्बर त्या मुलाचे नांव स्क्रीनवर दाखवले. सर्वांनी टाळ्यांचा कडकडाट केला. असे दहा मुलांसोबत केले. प्रत्येकवेळी संग्रहकाने बरोबर उत्तर दिले. विभागप्रमुख व प्राचार्यांनी आर्यनला स्वामीत्वहक्कासाठी (patent) अर्ज करायला सांगितले. त्यानंतर आर्यनने गंधग्राहकात थोडी सुधारणा केली जेणेकरून एकाद्या ठिकाणाहून माणूस निघून गेल्यानंतर ७२ तासांनंतरही गंधग्राहक

त्या माणसाच्या गंधाचे अंश नोंद करू शकेल. नंतर त्या गंधाची तीव्रता गंधसंग्रहक वाढवू शकेल अशा प्रकारची सुधारणा पण करण्यात आली. आणखी एक सुधारणा करण्यात आली ती म्हणजे, माणसांचा समूह असेल तर गंधग्राहक त्यांचे गंध एकसमयेकरून घेणार व नंतर संग्रहक ते वेगवेगळे करून संग्रहित करणार. त्यानंतर आर्यन व त्याच्या सहकाऱ्यांनी एक संकलक–प्रक्षेपक उपकरण बनविले व ते सातारा इथे एका मित्राच्या घरावर बसवीले. त्यानंतर आर्यनने आणखी एक संग्रहक तयार केला व तो त्याच्या पुण्याच्या मित्राकडे पाठविला. नंतर आर्यनने सांगलीच्या एका मित्राचा गंध घेऊन तो पुण्याच्या मित्राकडे नावासहित पाठविला. पुण्याच्या मित्राने त्याच्याकडील संग्रहकावर तो गंध आला आहे याची खात्री केली आणि सर्व मित्रांनी एकच जल्लोष केला.

भारताची सर्व क्षेत्रांत होत असलेली घोडदौड जगातील महाशक्ती म्हणवून घेणाऱ्या कांही देशांना बघवत नव्हती. त्यांना साथ होती देशातीलच अस्तनीतल्या निखाऱ्यांची. आणि एके दिवशी ती बातमी येऊन थडकली. पंतप्रधानांचे सल्लागार नानासाहेब यांची हत्या, हत्यारा फरार आणि देशभर एकच संतापाची लाट उसळली. नानासाहेब त्यांच्या राहत्या घरी अंथरुणात मृतावस्थेत आढळले होते. पोस्टमार्टम मध्ये त्यांच्यावर विषप्रयोग झाल्याचे निष्पन्न झाले होते. नानासाहेब अविवाहित होते. देशासाठी त्यांनी आपले आयुष्य वाहून घेतले होते. घराची सुरक्षा व्यवस्था अत्यंत चोख होती. मग हे कसे घडले? हत्याऱ्याने कोणताही पुरावा मागे सोडला नव्हता. कुठेही बोटांचे ठसे आढळले नाहीत, ना एखादी वस्तू हत्यारा गडबडीत विसरून गेला होता. दिल्लीच्या पोलीस महासंचालकांनी राज्याच्या नाकाबंदीचे आदेश दिले व पूर्ण दिल्ली पिंजून काढली, पण हत्यारा जणू हवेत विरून गेला होता. सर्व देशात अतिदक्षता जाहीर करण्यात आली. देशाचे गृहमंत्री अतिकभाई अत्यंत सक्षम म्हणून ओळखले जातात. त्यांनी सर्व राज्यांच्या पोलीस महासंचालकांसमवेत एक बैठक घेतली व शोधमोहीम जोरात राबवायचे ठरले. महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक श्री उपाध्ये हे देवचंद कॉलेजचे माजी विध्यार्थी होते. त्यांनी कॉलेजच्या प्राचार्यांची जातीने गाठ घेतली व याबाबत काय करता येईल या संबंधी चर्चा केली. चर्चा सुरु असतानाच प्राचार्यांना आर्यनच्या संशोधनाची आठवण झाली. त्यांनी उपाध्ये यांना त्या संबंधी विस्ताराने सांगितले. DGP उपाध्ये यांनी प्राचार्यांना आर्यनने ताबडतोब त्यांची गाठ घ्यावी असे सुचविले. सांगलीच्या पोलीस मुख्यालयात आर्यन पोचला. उपाध्ये साहेबांनी त्याचे स्वागत करून त्याला बैठकीच्या खोलीकडे नेले. बंद दाराआड त्यांची दोन तास चर्चा झाली. प्रथम उपाध्ये सरांनी आर्यनच्या शोधाविषयी पूर्ण माहिती घेतली. त्यानंतर पुढील प्रमाणे कामाची दिशा ठरली.

१) आर्यन नानासाहेबांच्या खोलीत जाऊन गंधांचे नमुने घेईल
व ते गंधसंग्रहकाला पुरविले (feed) जातील.

२) ज्या व्यक्ती माननीय नानासाहेबांच्या मृत्यूनंतर खोलीत आल्या होत्या त्यांच्या गंधांचे नमुने घेण्यात येतील व त्यांची नांवे देखील जाणून घेण्यात येतील. ते नमुने गंधसंग्रहकाला पुरविले जातील. पूर्वीच्या नमुन्यांशी जे नमुने जुळतील ती माणसे सुरक्षित असतील (त्यांचा नानासाहेबांच्या हत्येशी संबंध नाही) उरलेले गंधांचे नमुने ज्या व्यक्तींचे असतील त्या व्यक्तींना संशयित म्हणून धरले जाईल व त्यांचा शोध घेण्यात येईल.

३) प्रत्येक गावात एक केंद्र उभारायचे व तेथे जाऊन गावकऱ्यांनी आपापली माहिती सादर करायची आहे. त्यावेळी स्वयंसेवकांनी त्यांच्या नकळत त्यांचा गंध घ्यावायचा आहे. प्रत्येक केंद्रावर पाच गंधग्राहक पुरावावेत.

४) शहरी भागात प्रत्येक मोहल्यासाठी एक केंद्र असावे. बाकी व्यवस्था वरीलप्रमाणे असावी.

५) भारतात साधारण ६,४८,००० खेडी व ८००० शहरे आहेत. त्यांमधील केंद्रांच्या संख्येनुसार व प्रत्येक केंद्रावर पाच या प्रमाणात गंधग्राहक तयार करावेत.

६) स्वयंसेवकांनी त्यांचेकडील गंधग्राहकांद्वारे गोळा झालेली माहिती त्यांच्या केंद्राच्या गंधसंग्रहकात भरावी व केंद्रप्रमुखाने ती दिल्ली स्थित महागंधसंग्रहकाकडे पाठवावी.

७) सर्व गंधसंग्रहक दुरस्थ पद्धतीने एकमेकांशी व दिल्लीस्थित महागंधसंग्रहकाशी जोडले जावेत. त्यासाठी इस्रोने याच कामासाठी समर्पित असा उपग्रह भुस्थिर कक्षेत प्रस्थापित करावा.


८) सर्व नागरिकांनी केंद्रावर येऊन माहिती देणे बंधनकारक केले जावे, अन्यथा कठोर शिक्षेची तजवीज करण्यात यावी.

बैठक संपली. DGP उपाध्ये यांनी या बैठकीची माहिती माहिती केंद्रीय गृहमंत्र्यांना दिली. त्यांनी तत्परतेने या योजनेला संमती दिली. आर्यन श्री उपाध्ये यांचे समवेत दिल्लीला गेला. माननीय नानासाहेब यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांच्या झोपण्याच्या खोलीतील गंध त्याने त्यांच्या गंधग्राहकावर घेतले व ते त्याने गंधसंग्रहकावर अंतरित (transfer) करून एकत्रित झालेले गंध वेगवेगळे केले. माननीय नानासाहेबांच्या मृत्यू नंतर ज्या ज्या व्यक्ती त्यांच्या खोलीत आल्या होत्या त्यांची नांवे एका रजिस्टर मध्ये होती. त्या सर्वांच्या गाठी घेऊन त्यांचे गंध सुद्धा त्याने गंधग्राहकावर घेतले. ते गंध देखील त्याने गंधसंग्रहकावर अंतरित (transfer) केले. त्यावेळी असे आढळून आले कि, फक्त एक गंध सोडून बाकी गंध नवीन घेतलेल्या गंधांशी जुळत आहेत आणि त्या एका गंधाची तीव्रता अत्यंत क्षीण आहे. याचा अर्थ तो गंध ज्याचा आहे तो नानासाहेबांचा हत्यारा असणार!

दोन आठवड्यातच आवश्यक तेव्हढे गंधग्राहक, गंधसंग्रहक व दिल्लीस्थित महागंधसंग्रहक यांचे उत्पादन करण्यात आले. गावे व शहरे यांनुसार केंद्रांची स्थापना करण्यात आली, या कामासाठी समर्पित असा उपग्रह स्थिर कक्षेत स्थापित करण्यात आला, स्वयंसेवकांची निवड करण्यात आली, त्यांना एक दिवसाचे प्रशिक्षण दिले गेले व गोपनीयतेची शपथ दिली गेली. खेडोपाडी व शहरांमध्ये जनगणना करायची आहे व सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले. जे सहकार्य करणार नाहीत त्यांचेवर कठोर कारवाई करण्यात येईल असेही सूचित करण्यात आले.

पुढील आठवडाभरात देशभरातील सर्व माणसांच्या गंधांचा विदा गोळा झाला. आर्यनने त्याच्या गंधसंग्रहकावरील तो विविक्षित गंध पण महागंधसंग्रहकाला त्याची तीव्रता वाढवून पुरविला, आणि तुलना करा (compare) ही आज्ञा (command) देताच महागंधसंग्रहकाने कांही सेकंदांतच त्या माणसाचे नांव स्क्रिनवर दाखविले. तो दुसरा तिसरा कोणी नसून नानासाहेबांचा स्वयंपाकी मनोज निघाला. लगोलग पोलीस त्याच्या घरी गेले व त्याला अटक केली. त्याच्याकडून जे कळलं ते भयानक होतं. मनोज गेली पंधरा वर्षे माननीय नानासाहेबांकडे स्वयंपाकी म्हणून कामाला होता. नानासाहेब संघाचे सहकार्यवाह असल्यापासून तो त्यांना ओळखत होता. तो त्यांच्या गावचाच म्हणजे कोल्हापूरचा होता. त्यांनीच त्यांना दिल्लीला आणले होते. तो महाराष्ट्रीयन पद्धतीचा शाकाहारी स्वयंपाक करण्यात माहीर होता. नानासाहेबांना त्याचा स्वयंपाक अत्यंत आवडायचा. तो त्यांच्या अत्यंत विश्वासातला होता. तरी पण त्याने असे का केले असं विचारलं असता तो म्हणाला, ''हनी या अतिरेकी संघटनेला श्री. महिंद्र यांनी पाकिस्तान भारताला जोडला, हे

अजिबात आवडलं नव्हतं. पंतप्रधानांना हे करण्याचा सल्ला नानासाहेबांनी दिला होता. या संघटनेला पाकिस्तान परत स्वतंत्र करायचा होता, त्यातला अडसर म्हणजे नानासाहेब, हे त्यांच्या लक्षात आलं होतं, म्हणून त्यांनी त्यांना संपवायचा बेत आखला होता. त्यासाठी त्यांनी माझ्या बायकोला व मुलाला ताब्यात घेतलं होतं. मी जर त्यांच्या सांगण्याप्रमाणे वागलो नाही तर त्यांनी दोघांना हालहाल करून मारायची धमकी दिली होती.'' त्यानंतर तो ओक्साबोक्सी रडू लागला. म्हणाला, ''मी चुकलो. मला फाशी द्या. मी देशद्रोही आहे.'' दिल्लीचे DGP श्री. सिन्हा यांनी त्याला शांत केले व तू हे सर्व कसे केलेस असे विचारले. तो म्हणाला, ''हनीच्या माणसांनी नानासाहेबांच्या दिनचर्येचा सखोल अभ्यास केला होता. आपल्यातल्याच कांही अस्तनीतल्या निखऱ्यांनी



त्यांना बातम्या पुरविल्या होत्या. जेवणानंतर त्यांना चेरी लावलेले मसाला पान आवडते ही माहिती त्यांनी काढली होती. त्यांनी मला त्या दिवशी कामावर जातांना शर्टाचे एक बटण तोडून तिथे एक टाचणी लावायला दिली. पान तयार झाल्यानंतर मी टूथपिकने पानाला टोचायचे नाटक करायचे. टूथ पिक बोथट आहे असा बहाणा करून शर्टाच्या टाचणीने त्याला टोचायचे. टोचत असतांना टाचणीच्या डोक्यावर जरा दाब द्यायचा. नंतर परत चेरीमध्ये टूथ पिक टोचून चेरी पानाला लावायची असा तो प्लॅन होता. DGP सिन्हांना सर्व गोष्ट लक्षात आली. टाचणीमध्ये बारीक पोकळी असणार, त्यात जहाल विष असणार, टाचणीच्या डोक्यावर दाब दिल्यावर ते विष पानात गेले असणार व ते पान खाल्याने नानासाहेबांचा मृत्यू ओढवला. DGP साहेबांनी ही गोष्ट गृहमंत्री अतिकभाईच्या कानावर घातली. त्यांनी ताबडतोब वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची बैठक बोलावून हनी संघटनेवर कारवाई करायचे आदेश दिले. पोलिसांनी देखील त्वरेने कार्यवाही करून हनी संघटनेचा म्होरक्या हबीब यास अटक केली. पोलिसी खाक्या दाखवताच तो पोपटासारखा बोलू लागला. त्याने गुन्हा कबूल केला व हत्येत गुंतलेल्या दहा साथीदारांची नांवे सांगितली. पोलिसांनी सर्वांना अटक केली. पोलिसांनी हबीब व त्याच्या साथीदारांविरुद्ध नानासाहेबांच्या हत्येचा गुन्हा दाखल केला. न्यायालयाने सर्व पुराव्यांच्या आधारे हबीबला फाशीची शिक्षा ठोठावली व त्याच्या साथीदारांना हत्येत मदत केल्याबद्दल जन्मठेपेची शिक्षा सुनावली. त्यानंतर अतिकभाईनी नावीन्यपूर्ण संशोधनाद्वारे गुन्ह्याची उकल केल्याबद्दल आर्यनचे खूप कौतुक केले व त्याला दहा लाख रुपयांचे बक्षिस जाहीर केले.

◆

**राजीव पुजारी**
मोबा. ९५२७५४७६२९